नियमीत फौजदारी खटला क्र. **१७०/२०२४**
निशाणी क्र. **९/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **महेंद्र वल्लभ पाटील** |
| वय सुमारे | : | ४८ वर्षे, व्यवसाय : टेम्पो चालक |
| निवासस्थान | : | मु. कातळपाडा, पो. कुसुंबळे, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

मला एक वैजेश नावाचा मुलगा आहे. घटना दि. २६/०७/२०२४ रोजी सायं. ७.०० वाजता बांधण येथे घडली. मी व माझा मुलगा मार्केटमध्ये आमच्या चारचाकी गाडीने जात होतो. त्यावेळी गणेश चवरकर याची गाडी बाजूला होती. त्यांनी सांगितले की, तुला गाडी चालवता येते का? कशी गाडी चालवतोस? आम्ही गाडी थांबवली, तो आला व त्याने गाडीवर फटके मारुन आमची गाडीची चावी काढून घेतली. मी त्याला विचारले की, गाडीची चावी का घेतलीस? माझी चावी दे. मला वाटले की, तो चावी देतो. त्याने खिशातून काय काढले हे मला माहीत नाही. त्याने जे काय काढले त्याने माझ्या डाव्या कुशीत व डाव्या कानाच्या खाली व पाठीत डाव्या बाजूला मारले. माझ्या पाठीतून रक्तस्त्राव होत होता. माझा मुलगा मला पकडण्यासाठी आला असता त्यावेळी आरोपीला वाटले की, माझा मुलगा त्याला पकडण्यासाठी येत आहे त्यामुळे त्याने माझ्या मुलाच्या डोक्यात त्याच्या हातात जे होते त्याने मारले. त्यानंतर तो तेथून पळून गेला.

०२. त्यानंतर मी माझा भाऊ नरेंद्र पाटील याला फोन केला व घटनेबाबत सांगितले. त्यानंतर तो तेथे आला. माझा भाऊ आम्हाला पोलीस ठाण्यात घेवून

जात असताना अर्ध्या रस्त्यात पोलीस गाडी आली व पोलीसांनी आम्हाला दवाखान्यात जाण्यास सांगितले. तेथून आम्हाला पेझारी येथील दवाखान्यात नेले. तेथून आम्हाला अलिबाग येथील सिव्हील हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले. तेथे आम्हा दोघांना अॅडमिट केले होते. पोलीसांनी दवाखान्यात आमचा जबाब घेतला होता. मला माझी फिर्याद दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. १०** देण्यात येते. आरोपी गणेश चवरकरला पाहिल्यास मी ओळखू शकेन. तो आज न्यायालयात हजर नाही. (आरोपीच्या वकीलांनी त्याच्या ओळखीबाबत आक्षेप न घेतल्याने आरोपीचा गैरहजेरीमाफीचा अर्ज मंजूर)

०३. आरोपीने ज्या हत्याराने मारले होते त्या हत्याराचा तुकडा माझ्या मुलाच्या डोक्यात राहिला होता. तो तुकडा मला दाखवण्यात आला. आता मला दाखवण्यात आलेला मुद्देमाल तोच आहे. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट–१ (MO-1)** देण्यात येते. पोलीसांनी घटनास्थळाच्या पंचनाम्याकरीता मला बोलावले होते. मी घटनास्थळ दाखविले होते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. पी.एन्. गडे यांचेमार्फत</u>** :

०४. हे म्हणणे खरे आहे की, पोयनाड ते बांधण फाटा हा रस्ता रहदारीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे वाहनांची सतत ये जा असते. हे म्हणणे खरे आहे की, मी अनोळखी इसमाविरुद्ध तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, जुलै महिन्यामध्ये साधारणपणे अंधार लवकर पडतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी अंधार लवकर पडला होता. हे म्हणणे खरे नाही की, अंधार

पडल्यामुळे मी आरोपीचा चेहरा पाहिला नव्हता.

०५. मी फिर्याद देताना आरोपीचे वर्णन पोलीसांना सांगितले नव्हते. पोलीसांना फिर्याद देताना आरोपीची गाडी आमच्या बाजूला होती असे सांगितले होते किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गाडीमध्ये चालक गाडीच्या उजव्या बाजूला बसतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी मी गाडीच्या उजव्या बाजूला बसलो होतो. घटना घडली त्यावेळी तेथे लोक जमा झाले होते. घटना साधारपणे १५ ते २० मिनिटे चालली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी मी गाडीतच बसलेलो होतो.

०६. माझा भाऊ फोन केल्यानंतर १५ ते २० मिनिटांनी घटनास्थळी आला. मी पोलीसांना फिर्याद देताना सांगितले नव्हते की, पोलीस गाडी अर्ध्या रस्त्यात आली व त्यांनी आम्हाला हॉस्पीटलमध्ये जाण्यास सांगितले. आम्ही पेझारी येथील दवाखान्यात किती वाजता पोहोचलो हे मला सांगता येणार नाही. पेझारी हॉस्पीटलमधून लगेचच आम्ही सिव्हील हॉस्पीटलला गेलो. सिव्हील हॉस्पीटलमध्ये आम्ही किती वाजता पोहोचलो हे मला सांगता येणार नाही.

०७. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला ओळख परेडसाठी बोलावले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी चार चाकी वाहनाचा क्रमांक फिर्यादीमध्ये दिलेला नाही. गाडीवर खड्डा पडला होता. रक्त जमिनीवर पडले होते. रक्त कपड्यांना लागले होते. रक्त लागलेले कपडे पोलीसांनी जप्त केले नव्हते.

०८. हे म्हणणे खरे आहे की, मी कातळपाडा, अलिबाग येथील कायमचा

रहिवाशी आहे. नरेंद्र पाटील हा माझा भाऊ आहे व वृषाली पाटील ही माझी पत्नी आहे.

०९. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा मुलगा चार चाकी गाडीने चाललो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या गाडीवर फटके मारुन माझी गाडीची चावी काढून घेतली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे.

१०. १२.३० ते १.०० वाजताच्या दरम्यान पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले होते, तारीख आता माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यासाठी गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१४/०७/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१७०/२०२४**
निशाणी क्र. **११/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सागर यशवंत पाटील** |
| वय सुमारे | : | ३५ वर्षे, व्यवसाय : पोलीस पाटील व शेती |
| निवासस्थान | : | मु. खातविरे, पो. कुसुंबळे, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

दि. ०२/०८/२०२४ रोजी पोयनाड पोलीस ठाण्यातील पाटील मॅडम यांनी मला पंचनाम्यासाठी बांधण स्टॉपवर बोलावले होते. दिलेल्या वेळेनुसार मी १.०० वाजता बांधण स्टॉपवर पोहोचलो. घटनास्थळी पाटील मॅडम, दुसरे पंच हर्षदा राऊत हजर होत्या. फिर्यादी महेंद्र पाटील घटनास्थळी हजर होते. १० मिनिटांनंतर पोलीसांनी पंचनाम्याला सुरुवात केली. फिर्यादीने घटनास्थळ दाखवले व दि. २६/०७/२०२४ रोजीची घटना सांगितली. घटनास्थळ हे बांधण नाका होते. घटनास्थळाच्या पूर्वेकडील रस्ता बांधण बाजारपेठेत जातो, पश्चिमेकडील रस्ता हा बांधण गावात जातो. उत्तरेला जंगम यांचे हॉटेल व घटनास्थळ हे नागोठणे—पेझारी रस्ता आहे. पोलीसांनी तेथे फोटो काढले व घटनास्थळाचा हातनकाशा काढला.

०२. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळाचा पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. घटनास्थळाचा हातनकाशा हा घटनास्थळाच्या पंचनाम्याचा भाग असल्यामुळे घटनास्थळाचा पंचनामा व हातनकाशा यांना एकत्रितपणे निशाणी देण्यात येते. त्यास **निशाणी क्र. पी—२** म्हणजेच **निशाणी क्र. १२** देण्यात येते. घटनास्थळाचे चार फोटो काढले होते. चार फोटोंना एकत्रितपणे **आर्टीकल 'ए'** देण्यात येते.

०३. पोलीसांनी दि. ३१/०७/२०२४ रोजी मला सायं. ७.०० वाजता पोयनाड पोलीस ठाण्यात बोलावले होते. पोलीसांनी मला एका डबीमध्ये असलेली एक टोकदार धातूची वस्तू दाखवली. ती वस्तू पोलीसांनी कामोठे पोलीस ठण्यातून आणली होती. सदर टोकदार वस्तू ही एम्.जी.एम्. हॉस्पीटलमध्ये फिर्यादीच्या मुलाच्या डोक्यामधून काढण्यात आली होती. ती वस्तू पोलीसांनी लिफाफ्यात टाकून लिफाफ्यावर माझी सही घेतली होती. ती वस्तू व डबी दाखवल्यास मी ओळखू शकेन. (आता साक्षीदारास डबी व डबीमध्ये असलेली वस्तू (एम्.ओ–१) दाखवण्यात आला.) तो पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्त केला होता. आता मला दाखवण्यात आलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–३** म्हणजेच **निशाणी क्र. १३** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. पी.एन्. गडे यांचेमार्फत</u>** :

०४. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस पाटील असल्यामुळे माझे पोलीस ठाण्यात येणे जाणे असते. हे म्हणणे खरे आहे की, माझी पोलीसांशी तोंडओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे संरक्षित केलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे मोकळी जागा असून तेथे लोकांची रहदारी असते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरुन काहीही जप्त केलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी रक्ताचे डाग नव्हते. (साक्षीदार संगतो की, पाऊस पडला होता.) हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी झटापटीबाबत खाणाखुणा नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजूबाजूला लोकांची दुकाने आहेत.

०५. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी पंचनाम्यासाठी गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाचे फोटो काढले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी लिहून तयार असलेल्या पंचनाम्यावर सह्या केलेल्या आहेत.

०६. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी दि. ३१/०७/२०२४ रोजी मला सायं. ७.०० वाजता पोयनाड पोलीस ठाण्यात बोलावले होते व पोलीसांनी मला एका डबीमध्ये असलेली एक टोकदार धातूची वस्तू दाखवली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती वस्तू पोलीसांनी कामोठे पोलीस ठण्यातून आणली होती, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर टोकदार वस्तू ही एम्.जी.एम्. हॉस्पीटलमध्ये फिर्यादीच्या मुलाच्या डोक्यामधून काढण्यात आली होती, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती वस्तू पोलीसांनी लिफाफ्यात टाकून लिफाफ्यावर माझी सही घेतली होती, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणताही जप्ती पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी आधीच तयार केलेल्या पंचनाम्यावर माझे सह्या घेतलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना मदत करण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१४/०७/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१७०/२०२४**
निशाणी क्र. **१७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **संजय विष्णू पाटील** |
| वय सुमारे | : | ४७ वर्षे, व्यवसाय : पोलीस पाटील |
| निवासस्थान | : | मु. भाकरवड, पो. पोयनाड, ता. अलिबाग |

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत** :

दि. १४/०९/२०२४ रोजी मला गायकवाड पोलीसांनी पोयनाड पोलीस ठाण्यात बोलावले होते. पोलीस ठाण्यात गणेश चवरकर, पोलीस व आम्ही दोन पंच होतो. आरोपीने हकीकत सांगितली. आरोपीने सांगितले की, गणेशने इकोवाल्याला अडविले व त्यांच्यात भांडणे झाली होती व गणेशने चाकू इकोवाल्याच्या कुशीत मारला होता. सदर भांडण सोडवण्यासाठी इकोवाल्याचा मुलगा मध्ये आला असता मुलाच्या डोक्यात मारले. त्यानंतर गणेश तेथून पळून गेला. त्यानंतर आरोपीने आम्हाला घटनास्थळी नेतो असे सांगितले. (साक्षीदारास पंचनामा दाखवण्यात आला.) त्यावर माझी सही आहे. (पंचनाम्यातील मजकूर वाचून दाखवण्यात आला.) तो बरोबर आहे. सरकारी वकीलांनी साक्षीदारास पंचनाम्यातील मजकूर 'त्यानंतर मी तो चाकू तेथेच फेकून देवून पोयनाड बाजूकडे पळून गेलो. तो चाकू ज्या ठिकाणी फेकून दिला ती जागा मी दाखवतो. तुम्ही माझेसोबत चला.' वाचून दाखवला.

**(सरकारी वकील साक्षीदारास सूचक प्रश्न विचारत असल्यामुळे आरोपीच्या वकीलांनी त्यास हरकत घेतली. सरकारी वकीलांनी केस लॉ दाखल करण्यासाठी**

**वेळ मागितला असल्यामुळे सरतपास ०२.४५ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आला**.)

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.                                    ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१०/०९/२०२५**.          मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**<u>मध्यान्हानंतर पुढील सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>** :

(The learned public prosecutor relied upon the judgment of the Hon'ble Supreme Court in **Shahaja @ Shahajan Ismail Mhd. Shaikh Vs. State of Maharashtra, 2022 LiveLaw (SC) 596**. By relying on the para No. 39 the learned Public Prosecutor argued that he is just reading over the panchanama to the witness as per the direction given by the Hon'ble Apex Court and the leading questions are not put to him. Therefore, he argued that the panchanama read over to the witness will not amount to suggesting the leading questions. Whereas the learned advocate for the accused argued that without declaring the witness hostile the panchanama cannot be read over and exhibited.

02. I have gone through the case law cited by the learned Public Prosecutor. It appears that for exhibiting panchanama, it is necessary to read over the same to the witness. I have also gone through the evidence. It appears that the learned Public Prosecutor had read over the panchanama and the panch had admitted the portion read over to him. Therefore, in view of the above case law, the objection cannot be sustained.)

०२. मला वाचून दाखवण्यात आलेला निवेदन पंचनाम्यातील मजकूर हा

बरोबर आहे. निवेदन पंचनाम्यास **निशाणी क्र. पी–४** म्हणजेच **निशाणी क्र. १८** देण्यात येते. पोलीस ठाण्यातून मी, आरोपी, पोलीस असे सरकारी वाहनाने आरोपी सांगेल त्याप्रमाणे पोयनाड दिशेने गेलो. आम्ही नागोठणे रस्त्याने बांधण येथे गेलो. बांधण स्टॉपवर आरोपीने थांबायला सांगितले व बाजारपेठेच्या दिशेने गाडी नेण्यास सांगितले. थोडे पुढे आरोपीने गाडी थांबवण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही खाली उतरलो. आरोपीने झाडीच्या दिशेने चाकू टाकल्याचे सांगितले. झाडीमध्ये पोलीसांनी शोधाशोध केली परंतु काही सापडले नाही. त्यानंतर पोलीसांनी पंचनामा केला. पंचनामा मला दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. ०२ वर माझी, आरोपीची सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–५** म्हणजेच **निशाणी क्र. १९** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकेन. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. पी.एन्. गडे यांचेमार्फत</u>** :

०३. मी पोलीस पाटील म्हणून काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस पाटील असल्यामुळे माझे पोलीस ठाण्यात येणे जाणे असते. हे म्हणणे खरे आहे की, मी इतर पंचनाम्यात सुद्धा पंच म्हणून काम केलेले आहे. १४ तारखेला अंदाजे दुपारी १.०० वाजताच्या सुमारास मी पोलीस ठाण्यात गेलो होतो. पोलीस ठाण्यात पंचनामा १.३० वाजता सुरु होवून १.४५ वाजता संपला. पोलीस ठाण्यातून आम्ही ३.०० ते ३.१५ वाजता निघालो. ज्या वाहनाने आम्ही गेलो त्याचा वाहन क्रमांक मला सांगता येणार नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये लॉग बुकमध्ये केलेल्या नोंदीबाबत उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशा कोणत्याही नोंदी झालेल्या नाहीत त्यामुळे त्याचा पंचनाम्यात उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणतेही निवेदन देण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आधीच तयार केलेल्या पंचनाम्यावर पोलीस ठाण्यात सह्या केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दिलेल्या निवेदनाप्रमाणे आम्ही कुठेही गेलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस पाटील असल्याने पोलीसांना मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१०/०९/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**R.C.No. 170/2024**
Exh. **21/C**

Deposition of Witness No. **04** for the State

I do hereby on solemn affirmation state that :-

My Name : **Dr. Anup Gautam Palsambkar**
Age about : 31 Years, Occupation : Medical Officer
Residence : KuberaKh Building, Alibag.

**Examination-in-Chief by A.P.P. Shri. P. S. Patil** :

I am qualified as M.B.B.S. On 26/07/2024 I was attached to Civil Hospital, Alibag as a Medical Officer. My duty hours were 9:00 pm. to 9:00 am. On 26/07/2024 patient namely Vaijesh Mahendra Patil and Mahendra Vallabh Patil were brought to casualty at about 9:29 pm. They narrated history of assault. On that day I examined Vaijesh Mahendra Patil and found following injury :

> Contusion laceration wound 2 cm x 0.8 cm x 0.8 cm. over left parietal region. The CT scan was advised. Linear metallic foreign body was seen in CT scan in left parietal lobe.

02. The said injury was caused by hard and sharp object. It was grievous in nature.

03. On that day, I examined Mahendra Vallabh Patil. He was resident of Katalpada, Tal. Alibag. He came to hospital on 26/07/2024 at about 9:48 pm. On examination of Mahendra Patil, I found following injuries.

1. Contusion laceration wound size 3.5 cm x 1 cm x 1 cm below left angle of mandible.
2. Contusion laceration wound size 1.5 cm x 0.80 cm x 0.8 cm. over left hypochondriac region
3. Contusion laceration wound size 3.5 cm x 1.5 cm x 1.5 cm over lumbar region

04. All the injuries were simple in nature. They were caused by hard and sharp object. I have taken their identification mark. Both the patients were hospitalized. Vaijesh Patil was referred to MGM hospital for further neurosurgery reference.

05. Accordingly, I issued injury certificates. The injury certificates now showed to me are the same. Its contents are true and correct and it bears my signature. It is marked as **Exh. 22** and **23**. The injuries are possible by the material object 'A' shown to me.

**Examination-in-Chief completed**.

**Cross-Examination for accused by Adv. Shri. P. N. Gade** :

06. Police refer the patient along with the letter. Police had not referred this case, the patients directly came to the hospital. It is true to say that the details are mentioned in the register. It is true to say that I have not given the copy of register to the police. It is true to say that I have not given X-ray report, USG report to the police. I don't remember on what date I gave medical report (Exh. 22 and 23) to the doctor. It is true to say that the history is not written over Exh. 22 and 23. It is true to say that the weapon of assault is not mentioned in medical certificates.

07. It is true to say that I can't tell whether the injuries were caused with the material object (Article 'A') only. It is true to say that the MLC registers are kept on our table or open rack.

08. It is not true to say that I have issued false medical certificates as per the say of police. It is not true to say that I am deposing false.

Cross-examination Over.

No Re-examination

R. O. & A. C.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **20/09/2025.**

:: **<u>C E R T I F I C A T E</u>** ::

Taken before me and signed by me in the presence of accused to whom the deposition is explained in vernacular and full opportunity to cross-examine the witness, is given.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **20/09/2025.**

नियमीत फौजदारी खटला क्र. **१७०/२०२४**
निशाणी क्र. **२५/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०५** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **वैजेश महेंद्र पाटील** |
| वय सुमारे | : | २० वर्षे, व्यवसाय : मंडप डेकोरेटर्स |
| निवासस्थान | : | मु. कातळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना अंदाजे एक वर्षापूर्वी घडली होती. सायं. ७:०० वाजता घटना घडली होती. माझे वडील इको गाडी चालवत होते. गणेश चवरकर याने माझ्या वडीलांची गाडी पोयनाड येथे जाताना अडवली. त्याने गाडीवर हाताने फटके मारण्यास सुरु केले. त्यानंतर त्याने गाडीची चावी काढली. माझे वडील त्याला समजावण्यास गेले. वडीलांनी त्याच्याकडे चावी मागितली व मला जावू दे असे म्हणाले. चवरकरने चावी देण्याऐवजी चॉपर काढला व माझ्या वडीलांच्या कुशीत भोसकले. चॉपर म्हणजे छोटा चाकू होता. त्याने माझ्या वडीलांच्या पाठीवर चाकूने मारले. मी सोडवायला गेलो. त्याने माझ्या डोक्यावर चाकूने मारले. त्यानंतर चवरकर तेथून पळून गेला.

०२. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. त्यानंतर मला सिव्हील हॉस्पीटल, पोयनाड येथे घेवून गेले. त्यानंतर आम्ही अलिबाग येथील हॉस्पीटलमध्ये गेलो. अलिबाग येथून मला मुंबई येथील एम्.जी.एम्. हॉस्पीटलमध्ये घेवून गेले. एम्.जी.एम्. हॉस्पीटलमध्ये माझे ऑपरेशन झाले. तेथे माझ्या डोक्याचे ऑपरेशन करुन त्यातून चाकूचा तुकडा काढण्यात आला. मी आरोपीला पाहिल्यास

ओळखू शकेन. तो आज न्यायालयात हजर आहे. मी तो चाकूचा तुकडा मला दाखवल्यास ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला आर्टीकल 'अ' कडील चाकूचा तुकडा तोच आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. पी.एन्. गडे यांचेमार्फत</u>** :

०३. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांची गाडी मी कधी कधी स्वत:ही चालवतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी गाडी चालवत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील गाडीतच बसून होते. माझे वडील गाडीच्या खाली उतरले होते. हे म्हणणे खरे नाही की, पूर्ण घटनेच्या वेळी मी गाडीतच बसून होतो.

०४. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. पोलीसांना जबाब देताना आरोपीने चॉपर काढला होता ही बाब पोलीसांना सांगितली होती की नाही मला हे माहीत नाही. साक्षीदार सांगतो की, त्यावेळी मी आजारी होतो. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता ती तारीख मला आठवत नाही. घटना अर्धा तास चालू होती. मला मारल्यानंतर भरपूर रक्त आले होते. रक्त कपड्यांवर सांडले होते. मला हे आठवत नाही की, पोलीसांनी कपडे जप्त केले होते किंवा नाही. घटना घडल्यानंतर मी १० ते १५ मिनिटे तेथे होतो.

०५. २ ते ४ मिनिटांत आम्ही पोलीस ठाण्यात पोहोचलो होतो. तेथून आम्ही पोयनाड येथील सरकारी दवाखान्यात गेलो होतो. आम्ही पोयनाड येथील दवाखान्यात गेलो होतो हे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. सदर बाब माझ्या जबाबात नमूद नाही. ती का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

पोलीस ठाण्यातून पोयनाड येथील दवाखान्यात आम्ही पाच मिनिटांत पोहोचलो. पोयनाड येथील दवाखान्यात आम्ही किती वेळ होतो हे मला आठवत नाही. तेथून सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग येथे किती वेळात पोहोचलो हे मला माहीत नाही. मी सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग येथे एक रात्र ॲडमिट होतो.

०६. पोयनाड पोलीस ठाण्यातून पोयनाड सरकारी दवाखाना येथे स्वतःच्या गाडीने गेलो होतो. पेझारी सरकारी दवाखान्यातून सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग येथे ॲम्ब्युलन्सने गेलो होतो. गाडीमध्ये रक्त सांडले नव्हते. आरोपीने गाडीवर फटके मारल्यामुळे गाडीचे नुकसान झाले होते का हे मला माहीत नाही.

०७. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे रहदारीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या आजूबाजूला लोकांची घरे व दुकाने आहेत. घटनास्थळी लोक जमले होते. अंदाजे ४० ते ५० लोक जमले असतील. त्या लोकांमध्ये आमच्या ओळखीचे कोणी नव्हते. आम्हाला सोडवायला कोणी आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या आधी आरोपीसोबत आमचे कोणतेही वाद नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी अज्ञात इसमाविरुद्ध फिर्याद दिली होती. हे मला माहीत नाही की आरोपीचे नाव संशयावरुन घेतले होते.

०८. हे म्हणणे खरे आहे की, आमचा मंडपाचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या डोक्यातून आर्टीकल 'अ' कडील चॉपरचा तुकडा काढला हे मी ठामपणे सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या वडीलांची गाडी अडवून चावी काढून आरोपीने चॉपरने मारले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाण्यात गेलो तेथून सरकारी दवाखान्यात गेलो,

हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मंडप बांधत असताना पोलवरुन खाली पडून मला जखम झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेशी आरोपीचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वडीलांच्या व पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **२६/०९/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**R.C.No. 170/2024**
Exh. **32/C**

Deposition of Witness No. **06** for the State

I do hereby on solemn affirmation state that :-

| | | |
|---|---|---|
| My Name | : | **Dr. Emad Badiuzzama Alvi** |
| Age about | : | 30 Years, Occupation : Senior Resident Doctor |
| Residence | : | MGM Hospital, Kamothe |

**Examination-in-Chief by A.P.P. Shri. P. S. Patil** :

01. I am qualified with an M.S. in General Surgery and am practicing as a Neurosurgeon. The patient, Vaijesh Mahendra Patil, an 18-year-old male, presented to the hospital on 27/07/2024 at around 7:00 PM. He was referred from Alibag Civil Hospital. On that day, I was posted in the Casualty Department at M.G.M. Hospital. The patient gave a history of assault by an unknown person using a sharp object on his head on 26/07/2024 at about 7:00 PM.

02. Following the incident, he initially went to a local hospital and was subsequently referred to Alibag Civil Hospital, where he was admitted. Local exploration of the wound was performed; however, the treating doctor was unable to remove the foreign object lodged in the patient's head. Due to this, the patient was referred to M.G.M. Hospital on 27/07/2024.

03. On arrival at M.G.M. Hospital, the patient's vital signs were stable. He had a sutured wound on the left side of the head and was conscious and oriented. A CT scan of the head was performed, which revealed a foreign body penetrating the left side

of the skull bone. The patient was then planned for surgical intervention. All possible risks and complications were explained to the patient's relatives, and informed written consent was obtained.

04. The surgery was performed on 28/07/2024 at about 8:30 AM. After administering general anesthesia, an incision was made around the existing wound. A metallic sharp object was found impacted in the left parietal bone. A small craniotomy was performed around the object. The bone fragment along with the metallic object was removed. The bone fragment was then divided into two parts to facilitate removal of the sharp object. There was an injury to the dura mater, and the object had also penetrated the brain parenchyma. The dura was repaired, the bone fragment was replaced, and the skin was closed.

05. The foreign object appeared to be the tip of a kitchen knife, measuring approximately 1.5 × 1 cm. The procedure was uneventful, and the patient was fully conscious postoperatively. The foreign object was handed over to the police. The patient was shifted to the ward and was discharged on 03/08/2024. The injury sustained by the patient was grievous in nature.

06. The material object–1, i.e., the tip of a knife, now shown to me, was removed from the patient's skull bone. At the time of handing over the said foreign object to the police, we had issued a covering letter to the police. The letter now shown to me is the same letter. As it is a xerox copy, it is marked as **Article 'B'**.

**Examination-in-Chief over**.

**Cross-Examination for accused by Adv. Shri. Piyush Gade** :

07. After the patient narrated the history to me, I came to know that it was a police case. It is true to say that when an MLC patient is referred to the hospital, we issue an injury certificate in the prescribed format. It is also true to say that we record the history in the MLC register. It is true to say that I did not issue an MLC certificate in this case. The witness volunteers that when an MLC is already registered in another hospital, we do not issue a fresh MLC certificate again.

08. It is true to say that the hospital is run as per the directions laid down in the Hospital Administration Manual. It is true to say that I have not provided any written document to the police specifically regarding the surgery conducted by me. It is true to say that I have not given the dimensions of the foreign object in writing to the police. It is true to say that, as per the Hospital Administration Manual, the required documents are to be handed over to the police within 48 hours. It is not true to say that we have failed to comply with the required provisions.

09. It is not true to say that if a person falls from a height of about 3 to 5 meters with force, and if the object is in a vertical direction, such an injury is possible.

10. It is not true to say that I am deposing falsely that I operated upon the patient. It is not true to say that I am deposing falsely that I removed the material object from the skull of patient

Vaijesh. It is not true to say that I am deposing falsely or that I am helping the police.

Cross-examination Over.

No Re-examination

R. O. & A. C.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **05/01/2026.**

:: **CERTIFICATE** ::

Taken before me and signed by me in the presence of accused to whom the deposition is explained in vernacular and full opportunity to cross-examine the witness, is given.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **05/01/2026**.